## प्रेसनोट

दि. ०४/१२/२०२४

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून तहसील कार्यालय शिरुर, जि. पुणे येथिल महसुल सहायक याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय २८ वर्ष |
| आरोपी नाव व कार्यालय | नितेशकुमार धोंडीबाराव धर्मापुरीकर, पद - महसुल सहायक, तहसील कार्यालय शिरुर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये लाच मागणी |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. ०४/१२/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ०४/१२/२०२४ |
| ठिकाण | तहसील कार्यालय शिरुर, जि. पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे गट नंबर १९ च्या सात-बारा उता-यावरील इतर हक्कातील नावे कमी करण्यासाठी तक्रारदार यांनी तहसिलदार कार्यालयास अर्ज केला होता. सदरचा अर्ज लोकसेवक नितेशकुमार धर्मापुरीकर यांचेकडे प्रलंबित असून, तक्रारदार यांचे सात-बारा उता-यावरील इतर हक्कातील नावे कमी करण्यासाठी लोकसेवक नितेश धर्मापुरीकर यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाच मागणी केलेबाबतची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक नितेशकुमार धर्मापुरीकर यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी ५,०००/- रुपयाची लाच मागणी करुन, ती लाच रक्कम रुपये ५,०००/- (पाच हजार) तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्री. प्रेम वाघमोरे तपास करत आहेत.

नमुद लोकसेवकाविरुद्ध यापुर्वी सुद्धा लाचलुचपत प्रतिबंधक पुणे विभागाकडून कारवाई करण्यात आली असून त्याबाबत त्यांचेवर दि. १०/७/२०२० रोजी इंदापुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ८०९/२०२, भ्र.प्र.अधि. क. ७ अन्वये गुन्हा दाखल असून, त्याबाबत मा. विशेष न्यायालय, बारामती येथे २०२३ मध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.